सन २०१५—१६ मध्ये नागपूर
महानगरपालिका शाळांच्या
शाळा प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्याबाबत.

# नागपूर महानगरपालिका नागपूर

## शिक्षण विभाग

## उपायुक्त कार्यालय

जावक क्र. ६०६/शि.वि./सशिअ/मनपा. नागपूर

सिव्हिल लाईन, नागपूर

दि. १० जुन, २०१५

संदर्भ :— १) शासन निर्णय क्र. उपक्रम २३१५/प्र.क.१२२/एस.डी.४, मंत्रालय, मुंबई तरीख : ०९ जून, २०१५

२) क्र.आर.टि.ई/शाळाप्रवेशोत्सव/२०१५—१६/५००/२४५३ प्राथमिक शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे—१ दि. १०/०६/२०१५

प्रस्तावना —

बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नूसार नागपूर शहरातील प्रत्येक बालकांचे नांव पटावर नोंदवले जाणे आवश्यक आहे. पटावर नोंदवले गेलेले प्रत्येक बालक दररोज शाळेत उपस्थित राहून गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळण्याचा हक्क आता कायद्याने मान्य केला आहे.

शाळा बालकांचे भविष्य घडविणे हे शाळा, शिक्षकांचे अद्वितीय स्थान मान्य करावे लागेल. उक्त अधिनियम २००९, नूसार बालकांना शाळेत प्रवेशीत करून त्याला हसत खेळत आनंददायी शिक्षण देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. शाळेतून दिले जाणारे शिक्षण हे जिवनदायी आहे, अशी शिक्षण हक्क कायद्यांची फलनिष्पती आहे. दर्जेदार शिक्षणासाठी शासनाबरोबर नागपूर महानगरपालिका कटिबध्द असून प्रत्येक मुल पटावर नोंदवले जाऊन ते नियमित शाळेत येणे यासाठी राज्यभर व मनपास्तरावर नवोपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

उन्हाळयांच्या दिर्घ सुटयांच्या आनंदानंतर विद्यार्थी जेव्हा २६ जून, २०१५ रोजी शाळेत येतील तेव्हा त्यांना त्यांची शाळा हवी हवीशी वाटली पाहिजे. शाळा परिसर स्वच्छ, सुंदर आणि प्रेरणादायी असल्यांस सुट्यानंतर बालकांना शाळेत आणावे लागेल. शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा निरिक्षक/विस्तार अधिकारी (जिप) शहर यांनी शाळा पूर्व दिनी शालेय व्यवस्थापन समिती, आणि वार्डातील युवक युवती मंडळे, बचतगट यांच्या सहकार्यातून उपलब्ध संसाधनाच्या सहाय्याने शाळा परिसर स्वच्छकरून, रांगोळी काढून, फुले आणि

पानाची तोरणे बांधून वर्ग खोल्यांना सुशोभित करून शाळा सुशोभित केल्यास विद्यार्थ्यांना शाळा अधिकाअधिक आवडू लागतील.

दिनांक २६ जून, २०१५ रोजी विद्यार्थ्यांमध्ये शाळा प्रारंभ होत आहेत. हा प्रारंभ चैतन्यमय आणि उत्साहवर्धक होण्यासाठी ''शाळा प्रवेशोत्सव'' मोठया उत्साहात आयोजित करण्यासाठी शासनाने निर्णय घेतलेला आहे.

त्याअनुषंगाने या कार्यक्रमाचे स्वरूप खालील प्रमाणे राहिल.

१) शाळा सुरू होण्याच्या पूर्व दिवशी म्हणजे दि. २५ जून, २०१५ रोजी मुख्याध्यापक, शिक्षकांनी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, बचत गटातील सदस्य व सेवाभावी संस्था यांचे सहकार्याने बैंठकी मध्ये,

- शाळेत नव्याने प्रवेशित होणाऱ्या बालकांच्या घरी भेट देणे.
- पदयात्रा, प्रभातफेरी काढणे.
- शाळा परिसर स्वच्छता/सुशोभीकरण करणे हे कार्य करावे.

२) शाळा सुरू होण्याच्या दिवशी सर्व शिक्षकांनी वेळेवर उपस्थित राहून प्रभातफेरी आयोजन, विद्यार्थ्यांचे फुले देवून स्वागत, मोफत पुस्तक वितरण, इत्यादी कार्यक्रम आयोजित करावे.

३) शाळा प्रारंभीच्या दिवशी, मुख्याध्यापक शिक्षक व शाळा निरिक्षकाी ज्या प्रभागात शाळा आहे. त्या प्रभागाचे मा. नगरसेवक यांना निमंत्रित करून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याची विनंती करावी.

४) मनपा. शिक्षणाधिकारी/जि.प. शिक्षणाधिकारी (प्राथ) यांनी शहरातील संसद सदस्य, पालकमंत्री महोदय व स्थानिक मंत्री महोदय, मा. महापौर, मनपातील पदाधिकारी यांना शहरातील एका शाळेत या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याची विनंती करावी व त्यांचा अहवाल मा. आयुक्त यांना त्वरित सादर करा.

५) मनपा. सहा. शिक्षणाधिकारी/उपशिक्षणाधिकारी (जि.प.) यांनी शहरातील संसद सदस्य, विधीमंडळ सदस्य व विधान परिषद सदस्य यांना शहर साधन केंद्रनिहाय एका शहरातील शाळेत या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याची विनंती करावी.

६) या कार्यक्रमाची व्यापक प्रसिध्दी जन संपर्क अधिकारी मार्फत करावी.

७) शिक्षण विभागाच्या शाळा निरिक्षक/विस्तार अधिकारी यांना मनपातील व राज्य शासनाच्या इतर विभागातील अधिकाऱ्यांना शाळा निहाय निमंत्रित करावे.

८) शाळेच्या प्रथम दिवशी मध्यान्ह भोजन योजनेतील जेवणात गोड पदार्थचा समावेश करावा.

९) शाळेच्या प्रथम दिवशी स्थानिक कलाकार अथवा माजी विद्यार्थी यांनी शिक्षणाबाबत सांस्कृतिक कार्यक्रम करणार असतील तर त्यास प्रोत्साहन दृयावे.

- शाळा प्रवेशोत्सवामध्ये विद्यार्थी केंद्रीत कार्यक्रम घेण्यात यावे, या कार्यक्रमाचा कालावधी जास्तीत जास्त एक तास असावा नंतर दैनंदिन कामकाजास सुरूवात करावी.

**शाळापूर्व तयारी आणि पूर्व दिनी घरभेटी शैक्षणिक पदयात्रा**

**दि. २५ जून, २०१५**

**वेळ सकाळी ७.०० ते १०.३०**

<u>उपक्रम :—</u>

१) सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यासह शिक्षकांचे शाळेत आगमन.
२) शाळा फलकावर प्रवेशपात्र बालकांची यादी प्रदर्शीत करणे.
३) ध्वनी वर्धकावर (लाऊट स्पीकर) आपल्या सर्व बालकांना सकाळी ७.०० वा. शाळेत पाठविण्याची विनंती करणे.
४) दोन किंवा तीन शिक्षकांचा गट तयार करून घरभेटी देणे.
५) शैक्षणिक पदयात्रा काढावी
६) वार्डातील प्रत्येक बालकांच्या घरापर्यंत कुणीतरी जाणे अपेक्षीत
७) व्यवस्थापन समिती सदस्य, बचतगट प्रतिनिधी, ज्येष्ठ नागरिकांसह प्रवेशपात्र बालकांचे अर्ज भरून घेणे.
८) बचत गट, सफाई कर्मचारी सहाय्याने शाळा परिसर स्वच्छ करणे, तोरणे बांधणे, ध्वनी वर्धकावर देशभक्तीवर वाजवणे, वर्ग खोली स्वच्छता करणे, फलक लेखन करणे इत्यादी.

**शाळेच्या पहिल्या दिवशी करावयाची कार्यवाही**

**दि. २६ जून, २०१५**

**वेळ सकाळी ७.०० ते १०.३०**

<u>उपक्रम :—</u>

१) सर्वांनी शाळेत उपस्थित राहणे.
२) पूर्व दिनी ज्या प्रवेशपात्र बालकांना प्रवेश दिला आहे. त्याची घोषणा करावी व उर्वरित प्रवेशपात्र बालकांची नांवे लाऊड स्पीकरवर घोषीत करावी व तात्काळ प्रवेश घेण्याचे पालकांना आवाहन करावे.
३) वार्डात देशभक्तीवर गीते गात, नारेदेत बालकांची प्रभात फेरी काढावी. वार्डातील युवक, ज्येष्ठ नागरिक व्यवस्थापन समितीतील सदस्या प्रभात फेरीमध्ये सहभागी होण्याची विनंती करणे.
४) पुस्तक दिनानिमित्त शालेय व्यवस्थापन समितीच्या उपस्थितीत सर्व बालाकंना मोफत पाठयपुस्तक व गणवेशाचे वितरण करावे. इयत्ता १ ली मध्ये

प्रवेश घेतलेल्या बालकांचे उपलब्ध असलेली फुले देवून मा. नगरसेवक, उपस्थित पदाधिकाऱ्याच्या हस्ते स्वागत/कौतूक करावे.

५) वर्षभर १०० टक्के उपस्थिती ठेवण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची माहिती दृयावी एकही विद्यार्थी शाळाबाहय राहणार नाही यांची सर्वांना प्रतिज्ञा दृयावी.

६) १०० टक्के उपस्थितीसह प्रत्यक्ष वर्गाध्यापनास प्रारंभ करावा.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून त्याचा अहवाल मुख्याध्यापकांनी शाळा निरिक्षकाडे सादर करतील.

उपायुक्त
नागपूर महानगरपालिका नागपूर

**प्रतिलिपी : माहितीस्तव सविनय सादर**

१. मा. महापौरजी, नागपूर महानगरपालिका, नागपूर
२. मा. उपमहापौर, नागपूर महानगरपालिका, नागपूर
३. मा. स्थायी समिती अध्यक्ष, नागपूर महानगरपालिका, नागपूर
४. मा. शिक्षण सभापती, नागपूर महानगरपालिका, नागपूर
५.मा.आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रत : उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित**

६. शिक्षणाधिकारी, मनपा./जि.प. नागपूर
७. सहा. शिक्षणाधिकारी, मनपा./जि.प. नागपूर
८. सर्व शाळा निरिक्षक, झोन क्र. १ ते १०, जि.प./म.न.पा. नागपूर
९. सर्व शहर साधन समन्वयक, केंद्र क्र १ ते ५ जि.प/मनपा. नागपूर
१०. सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका प्राथ/उच्च प्राथ/माध्यमिक जि.प./मनपा. नागपूर

उपायुक्त
नागपूर महानगरपालिका नागपूर